POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-५६ ● मुंबई, रविवार,२८ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# 5 जिल्ह्यांना रेड अलर्ट, 26 जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी

# उत्तर कोकणात मुसळधार पावसाचा इशारा

- राज्यात पावसाचा जोर वाढणार
- पुढील 48 तास महाराष्ट्रात कोसळधार
- बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने पावसाचा जोर वाढणार




**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

भारतीय हवामान विभागाकडून महाराष्ट्राच्या उत्तर किनारपट्टीसाठी पुढील २४ तासांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यानुसार ठाणे, पालघर आणि आसपासच्या किनारपट्टीवरील जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, उत्तर किनारपट्टीवर ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, काही ठिकाणी वाऱ्याचा वेग ६० किमी प्रतितासपर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्र किनारपट्टीवरील मासेमार व किनारपट्टीवरील नागरिकांनी पुढील २४ तास समुद्राकडे जाणे टाळावे, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

याशिवाय, पर्यटनस्थळे व बंदरांवर स्थानिक साधनसंपत्ती तैनात ठेवण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. किनारपट्टीवरील प्रमुख बंदरांना क्रमांक ३ चा सिग्नल लावण्यात आला आहे.

प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, या काळात सुरक्षिततेस प्राधान्य द्यावे आणि समुद्रात जाण्याचे टाळावे

राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढला आहे.गेले काही दिवस राज्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात पावसाने थैमान घातले आहे. मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले आहे. दरम्यान हवामान विभागाने पुन्हा राज्यात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे चिंता वाढली आहे.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने राज्यात पावसासाठी पोशाक हवामान तयार झाले आहे. सध्या परतीच्या पावसाचा जोर महाराष्ट्रात वाढला आहे. कोकण, मराठवाडा, कोकण भागात हवामान विभागाने मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने राज्यात यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. तसेच चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. काही दिवसांपासून राज्यात पावसाचा जोर वाढला आहे. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र भागात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

मराठवाडा, सोलापूर, विदर्भ भागात पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. राज्यात 30 तारखेपर्यंत पावसाचा जोर वाढणार आहे. कोकण किनारपट्टीवरील रत्नागिरी, रायगड आणि सिंधदुर्ग जिल्ह्यात तसेच ठाणे, मुंबई, पालघरमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे पुणे , सातारा, पश्चिम महाराष्ट तसेच सोलापूर, धारशिवमध्ये देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अजून पुढील काही दिवस राज्यात मुसळधार पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोरचे संकट अजूनही संपले नसल्याचे म्हटले जात आहे. 27 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या कालावधीत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य सरकारने नागरिकांना सतर्क तसेच काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदभार्तील काही भागात पाऊस होण्याची शक्यता आहे. दरम्यान शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी सरकारकडे केली जात आहे. दिवाळी आधी शेतकऱ्यांना मदत केली जाण्याची शक्यता आहे. मराठवाड्यासह राज्यभरात अतिवृष्टीने झोडपून काढले आहे. बीड, मराठवाडा, अहिल्यानगर आणि इतर अनेक जिल्ह्यांनाही अतिवृष्टीचा तडाखा बसला आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाने हाहाःकार माजवला आहे. ज्यामुळे सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे आणि जनजीवन विस्कळीत झाले आहे.

### कोकणात मुसळधार पावसाचा कहर, रेड अलर्ट जारी

पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह विजांच्या कडकडाटात अति मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे या जिल्ह्यांसाठी Red Alert देण्यात आला आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथेही जोरदार पावसाची शक्यता असून, Orange

### पश्चिम महाराष्ट्रातही सतर्कता आवश्यक

पुणे घाटमाथा परिसरात अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला असून, येथे देखील Red Alert जारी करण्यात आला आहे. कोल्हापूर व सातारा घाटमाथा येथे Orange Alert, तर पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांना Yellow Alert देण्यात आला आहे.

### मराठवाड्यात जोरदार पावसाचा इशारा

छत्रपती संभाजीनगर येथे अति मुसळधार पावसाचा इशारा असून Orange Alert जारी केला आहे. जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. यासाठी या जिल्ह्यांना ellow Alert देण्यात आला आहे.

### उत्तर महाराष्ट्रात वीजांपासून धोका, नाशिकसह 5 जिल्ह्यांना अलर्ट

धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे. नाशिक घाटमाथा परिसरासाठी Red Alert, तर उर्वरित जिल्ह्यांसाठी Orange आणि Yellow Alert लागू करण्यात आले आहेत.

### विदर्भातही पावसाची जोरदार शक्यता

अकोला, बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज असून, उर्वरित विदभार्तील जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासोबत वादळी वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे. विदभार्तील सर्व जिल्ह्यांसाठी Yellow Alert लागू आहे.

### हवामान विभागाचा नागरिकांना इशारा

राज्यातील अनेक भागांमध्ये आधीच पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे संभाव्य अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, सुरक्षित स्थळी राहावे आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात दोन दिवसीय 'लिंगभाव संवेदीकरण कार्यशाळा' संपन्न





**■नाशिक । प्रतिनिधी,**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीतर्फे शुक्रवार दिनांक २६ आणि शनिवार दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित दोन दिवसीय 'लिंगभाव संवेदीकरण कार्यशाळाह्ण यशस्वीरित्या संपन्न झाली. कार्यशाळेचा मुख्य उद्देश हा विद्यापीठातील विविध स्तरांवरील अधिकारी - कर्मचाऱ्यांमध्ये लिंगभाव समानतेविषयी जाणीव-जागृती निर्माण करणे, कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ (पॉश कायदा) बद्दल सविस्तर माहिती देणे व कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी सुसंवादी - निकोप वातावरण निर्मिती करणे हा होता. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या पुढाकाराने झालेल्या या कार्यशाळेत पुणे विद्यापीठाच्या स्त्री आणि लिंगभाव शिक्षणशास्त्र विभागाच्या चार सदस्यीय चमूने विषय व सत्रनिहाय मार्गदर्शन केले.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले तर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ संचालिका डॉ. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीच्या सदस्या श्रीमती हेमलता पटवर्धन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्त्री आणि लिंगभाव शिक्षणशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. स्वाती द्याहाडराव, डॉ. स्नेहा गोळे, डॉ. ललित भवरे व प्रा. दीपा टाक, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समितीच्या पीठासन अधिकारी डॉ. माधुरी सोनवणे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीत होती.

आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी स्त्री ह्न पुरुष यांच्यात समानता निर्माण व्हावी यासाठी कुटुंब ही सर्वात महत्वाची शाळा आहे. प्रत्येक मातेने लहानपणापासून आपल्या मुलांमध्ये सर्वांप्रती समान वागणुकीची भावना निर्माण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादित केले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन यांनी आपल्या कार्यशाळा समारोपाच्या भाषणात स्त्री ह्न पुरुष असा भेद न ठेवता सर्वांप्रती समान भावना ठेवण्यासाठी प्रत्यक्षात सकारात्मक कृतीची गरज व्यक्त केली. पूवार्पार भारतीय संस्कृती व समाजात स्त्रीला पुरुषापेक्षा उच्च स्थान देण्यात आल्याचे त्यांनी उदाहरणांसह सांगितले. विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीच्या सदस्या श्रीमती हेमलता पटवर्धन यांनी भारतीय समाजात अधिकार सर्वांना कळतात पण जबाबदारीची जाणीव त्याप्रमाणात नसते अशी खंत व्यक्त केली.

कार्यशाळेत लिंगभाव समानतेचे महत्त्व, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) कायदा २०१३ (पॉश कायदा) : एक ओळख, लिंगभाव समानता आस्थापनेमध्ये व्यवहारात आणावयाची कशी?, विशाखा कायदा, राजस्थानातील भंवरीदेवी न्यायालयीन प्रकरण याविषयीची माहिती देण्यात आली.

तसेच व्याख्यान, चर्चासत्र, प्रश्नोत्तरे, प्रत्यक्ष कृती व विविध खेळातून प्रबोधन करण्यात आले. समारोप प्रसंगी सहभागी सदस्य श्री. भाऊसाहेब डांगे, श्रीमती दिपाली तायडे, हृषीकेश पवार, प्रा. राजकुमार ननावरे यांनी कार्यशाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. समिती सदस्य श्री. राजेंद्र वाघ यांनी मान्यवरांची ओळख करून दिली.

सूत्रसंचालन समिती सदस्य सौ. संगीता देशपांडे व डॉ. भागवत चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन डॉ. माधुरी सोनवणे यांनी केले. कार्यशाळेसाठी विद्यापीठातील सर्व विद्याशाखा संचालक, प्राध्यापक, अधिकारी - कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, सुरक्षा रक्षक, स्वच्छता कर्मचारी आणि शेतमजूर उपस्थित होते.

## अंबाबाईच्या मुखदर्शन रांगेत ७ आरोपींना एआयने शोधले



**■मुंबई । प्रतिनिधी,**

अंबाबाईच्या मुखदर्शन रांगेत ७ आरोपींना एआयने शोधले- अंबाबाईच्या नवरात्रौत्सवात पहिल्यांदाच यंदा एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या एआयने अंबाबाई मंदिरातील मुखदर्शनाच्या रांगेत उभ्या असलेल्या ७ आरोपींना शोधून काढले आहे. त्यापैकी चार जणांना पकडण्यात यश आले आहे.

मुखदर्शन रांगा आणि रात्रीचा पालखी सोहळा या दोन ठिकाणच्या संवेदनशील घडामोडी एआयने टिपल्या. या दोन्ही ठिकाणी भाविकांची सर्वाधिक गर्दी होते. या गर्दीत चोरांचाही वावर असतो. अंबाबाई मंदिरातील सर्व सुरक्षा यंत्रणा व भाविकांच्या गदीर्चे व्यवस्थापन आता एआयच्या मदतीने केले जात आहे. यासाठी अंबाबाई मंदिरातील १२२ कॅमेऱ्यांना हे तंत्रज्ञान जोडले गेले आहे. गेल्या चार दिवसांत ७ आरोपी मंदिर परिसरात आढळले. त्यापैकी चार जणांना पकडले. आरोपीसह भाविकांच्या चेहऱ्याचे फोटो , तासनिहाय अंबाबाई मंदिरातील भाविक संख्या,अंबाबाई मंदिरातील गदीर्ची क्षमता संपली की अलर्ट, हीट मॅप सिस्टीम- गदीर्ची ठिकाणे शोधून अलर्ट आदी कामे एआयच्या माध्यमातून होत आहेत. त्याचप्रमाणे शहरातील १५७ कॅमेऱ्यांना एआय तंत्रज्ञानाने जोडले असून त्यातून वाहतुकीच्या कोंडीची ठिकाणे शोधली आहेत. सीपीआर ते अंबाबाई मंदिर, रंकाळा टॉवर ते गंगावेश , महाद्वार ते पापाची तिकटी, बिंदू चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जास्त कोंडी आढळली आहे.


## 'पप्पा जसे गेले तसे कोणाचेही न जावो', कर्ज आणि अतिवृष्टीने जीव गमावलेल्या शेतकऱ्याच्या लेकीची सरकारला भावनिक साद



**■मराठवाडा। प्रतिनिधी,**

मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाले असून, या नैसर्गिक संकटाने अनेकांचे संसार उद्ध्वस्त केले आहेत. अतिवृष्टी आणि खासगी सावकारांच्या कर्जाला कंटाळून धाराशिव जिल्ह्यातील शरद गंभीर (वय 40) तरुण शेतकऱ्याने बुधवारी (ता. 24) गळफास घेऊन आत्महत्या केली. वडिलांच्या पश्चात त्यांचे 11 वर्षांची मुलगी श्वेता आणि 5 वर्षांचा मुलगा वनवासी झाले आहेत. श्वेताने तिच्या वडिलांची व्यथा आणि सरकारला केलेली भावनिक विनंती ऐकून संपूर्ण मराठवाडा हेलावून गेला आहे. श्वेताचा वडिलांच्या व्यथा सांगणारा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे. दिवंगत शेतकरी शरद गंभीर यांची 11 वर्षांची मुलगी श्वेता गंभीर हिने वडिलांच्या आठवणी सांगताना डोळ्यात अश्रू आणले. ती म्हणाली, माज्या वडिलांना दिवसातून पंधरा-पंधरा मिनिटांनी फोन यायचे. सुट्टीच्या दिवशी रानात आले की, पप्पा आमच्या गळ्यात पडून रडायचे. कोणाचा फोन येतोय, असं विचारलं तर काहीच सांगत नव्हते. त्यांनी सर्व गोष्टी एकट्याने सहन केल्या आणि शेवटी माझे पप्पा जसे गेले तसे कोणाचेही जाऊ नये, असं म्हणत श्वेताच्या अश्रूंचा बांध फुटला. श्वेताच्या म्हणण्यानुसार, तिच्या वाढदिवसाच्या दोन दिवस आधी तिचे वडील तिला धाराशिवला घेऊन जाणार होते, पण तिनेच पैसे आल्यावर जाऊह्न असं म्हटलं. त्यावर वडिलांनी फक्त हसून वेळ मारून नेली. त्यांच्याकडं पैसंच नव्हतं. कर्ज काढून सगळं शेतात घातलं, तेही संपलं, म्हणून खासगी सावकारांकडून पैसं घेतलं. ते पण शेतात गेलं अन्‍-शेतातील पीक पाण्यात गेलं,ह्न ही व्यथा सांगताना तिचे मन हेलावून गेले. शरद गंभीर यांच्या कुटुंबाचे अस्मानी संकटामुळे सर्वस्व हिरावले गेले आहे. त्यांची सहा एकर शेती होती, ज्यात निम्मी बागायती आणि निम्मी जिरायती ) होती. शरद यांनी विविध बँकांकडून कर्ज घेतले होते. मात्र, अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले. हाता-तोंडाशी आलेली पिके पाण्यात वाहून गेल्याने आणि कर्जफेडीचे मोठे संकट समोर उभे राहिल्याने त्यांनी अखेर मृत्यूला कवटाळले.

## वाहतूककोंडी सोडविण्यासाठी मुंबईत नवीन ६ बोगदे बांधणार



वाहतूककोंडी सोडविण्यासाठी मुंबईत नवीन ६ बोगदे बांधणार- मुंबई महापालिका आता शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी शहर आणि उपनगरांना जोडणारे नवे सहा बोगदे बांधणार आहे. या कामासाठी पालिकेने ४,३९२ कोटींच्या निविदा काढल्या आहेत. प्रत्येक बोगद्यासाठी ७३२ कोटी रुपये खर्च होण्याचा अंदाज आहे. यामध्ये कंत्राटदाराची निवड झाल्यावर प्रकल्पाचा आराखडा निश्चित केला जाईल. पालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की,मुंबई शहरात होर्णाया वाहतूककोंडीवर तोडगा म्हणून पालिकेने मुंबईच्या पूर्व व पश्चिम उपनगरात सहा बोगदे उभारण्याचा निर्णय घेतला आहे. हे बोगदे गोरेगाव-मुलुंड लिंक रोड आणि मुंबई कोस्टल रोड (पहिला व दुसरा टप्पा) यांच्याशी जोडले जाणार आहेत. या प्रकल्पासाठी पालिका प्रशासन एकूण ४,३९२ कोटी रुपये खर्च करणार आहे, तर प्रत्येक बोगद्याच्या बांधकामासाठी ७३२ कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता आहे. दक्षिण मुंबईतील ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह दुहेरी बोगदा प्रकल्प असून तो मरिन ड्राईव्हला समांतर बांधला जात आहे. हे बांधकाम पूर्ण झाल्यावर पूर्वेकडील फ्रीवेला अटल सेतूशी जोडले जाईल आणि दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# बहुराष्ट्रीय लेखकांचा बुकर...




**'बु**कर' पुरस्काराची लघुयादी या आठवड्यात जाहीर झाली आणि एकसमान वैशिष्ट्य असलेल्या लेखकांची पुस्तके त्यात समाविष्ट होण्याचा योग जुळून आला. ते वैशिष्ट्य म्हणजे जन्माने कुठल्याही राष्ट्राचे ते प्रतिनिधित्व करीत असले, तरी त्यांच्याबाबत देशांच्या सीमाच पुसल्या गेल्यात. लघुयादीतील लॅण्ड इन द विंटर या कादंबरीचे लेखक अॅण्ड्रू मिलर जन्माने ब्रिटिश. पण जडण-घडणीची वर्षे त्यांनी घालविली ती स्पेन,जपान, आयर्लंड आणि फ्रान्स या देशांत. आपली बारावी कादंबरी द रेस्ट ऑफ अवर लाइव्ह्ज बुकरच्या स्पर्धेत पोहोचविणाऱ्या बेन मार्कोविट्झ यांचा जन्म अमेरिकेतील कॅलिफोर्नियाचा. पण शिक्षण झाले इंग्लंड आणि जर्मनी या देशांत. तरुणपणीचा बराच काळ वास्तव्य टेक्सास या अमेरिकी शहरात. फ्लेश कादंबरी लिहिणाऱ्या डेव्हिड सलॉय या हंगेरी-ब्रिटनमधील नागरिकत्व असलेल्या लेखकाचा जन्म कॅनडाचा मात्र वडिलांच्या नोकरीमुळे शैक्षणिक तसेच भाषिक वाढ झाली ती लेबनॉन आणि लंडन शहरांत. ऑडिशन कादंबरीवाल्या केटी किटमुरा या नावाने आणि चेहऱ्याने पुरत्या जपानी दिसत असल्या, तरी जन्म कॅलिफोर्नियाचा. पीएचडीपर्यंत शिक्षण लंडनमधले. वास्तव्यही ब्रिटनमधलेच. लघुयादीमधील फ्लॅशलाइट कादंबरीच्या लेखिका सुझन चॉय यांचा जन्म अमेरिकेत कोरियन पिता आणि रशियन आईच्या पोटी. कोरियन वडिलांच्या जपानशी असलेल्या संबंधांमुळे त्यांचेही जपानप्रेम कादंबरीभर उफाळून आलेय. अजूनही भारतीय नागरिकत्व जपलेल्या किरण देसाई यांचे वास्तव्य किंवा जडण-घडण युरोप-अमेरिकेतले. त्यांच्या द लोन्लीनेस ऑफ सोनिया ॲण्ड सनी या कादंबरीने बुकरच्या लघुयादीत धडक दिली. ब्रिटिश-अमेरिकी मासिके आणि रविवारच्या पुरवण्यांत दीर्घयादी ते लघुयादी काळात त्यांच्या जितक्या मुलाखती झाल्यात, तितका प्रसिद्धीचा लाभ यंदाच्या बुकरयादीमधील कोणत्याच स्पर्धकाला झालेला नाही. यादीतील हे सारे स्पर्धक बहुराष्ट्रांतील जगण्याचा बृहद अनुभव घेतलेले म्हणून या लघुयादीचे महत्त्व इतर कोणत्याही वर्षापेक्षा भिन्न ठरावे. निवड मंडळाचे अध्यक्ष लेखक रॉडी डॉयल यांनी लघुयादीमध्ये दाखल झालेल्या कादंबऱ्यांतील मानवतावादी दृष्टिकोनाचे कौतुक केले. कथा भिन्न असल्या तरी हा मानवतावादी दृष्टिकोन व्यक्तीच्या देशसीमा पुसल्यानंतर येत असावा काय, असा प्रश्न यादीतील लेखकांकडे पाहिल्यावर येतो. म्हणजे किरण देसाई यांच्या कादंबरीत भारतातील मध्यमवर्गी कुटुंबाचे दैनंदिन व्यवहारही आहेत आणि अमेरिकेतील उच्चभ्रू जगण्याचे तपशीलदेखील आहेत. पण कादंबरी सामूहिक गराड्यातील दोन व्यक्तींच्या एकटेपणाच्या गोष्टीवर केंद्रित केलीय. प्रश्न-समस्यांच्या मिती वैश्विक असलेल्या यादीतील सगळ्या कादंबऱ्या. स्पर्धकांत तीन महिला आणि तीन पुरुष लेखक असा समसमानतेचा प्रकारही पहिल्यांदाच झालाय. १५९ कादंबऱ्यांतून पुढे आलेल्या या सहा कादंबऱ्यांचा निकाल १० नोव्हेंबरला लागेल. तोवर किरण देसाई यांच्यावरील मुलाखती-लेखांचा आकडा शेकडा ओलांडलेला असेल. त्यांच्या नावावर सट्टादेखील नवा विक्रम करेल. अन् तोवर या पानात बुकरायण हे नैमित्तिक सदर या वर्षीदेखील वाचकांना भेटत राहील. लेखक ख्रिास पॉवर यंदाच्या बुकर निवड समितीमधील एक सदस्य. सहा पुस्तकांच्या निवडीसाठी १५३ पुस्तकांना टोला अशा आशयाचे शीर्षक असलेला लेख त्यांनी गार्डियनमध्ये नुकताच लिहिला. निवडल्या गेलेल्या पुस्तकांची महत्ता निर्विवादच असते. परीक्षक मंडळ त्यांना लघुयादीपर्यंत आणण्यापूर्वी काय विचार करते. त्यांतून निवड सर्वमताने कशी होते, याचा दाखला या लेखातून सापडू शकेल.

किरण देसाईंचा लेखनसोस...

परदेशी माध्यमांनी २० वर्षांपूर्वीच बुकर पारितोषिक मिळविल्यानंतर किरण देसाई यांच्या अज्ञातवासाबद्दल बऱ्याच गोष्टी मुलाखतींमधून खणून काढल्यात. भारतीय लेखिका आणि पत्रकार मेघना पंत यांनी घेतलेली ही खास मुलाखत. व्होग इंडियासाठीची. यात द लोन्लीनेस ऑफ सोनिया ॲण्ड सनी कादंबरीच्या पहिल्या खड्यार्तील संपादनाची छायाचित्रेदेखील पाहायला मिळतील. ट्विटरपासून समाजमाध्यमांमध्ये न झळकण्याचा किरण देसाई यांचा शिरस्ता याचबरोबर लेखनप्रक्रियेचा तपशील, असा चांगला ऐवज या मुलाखतीत आहे.

तारांकित यूट्यूबरची टीका...

एरिक कार्ल ॲण्डरसन हा फक्त नव्या पुस्तकांची माहिती देणारा यूट्यूबर. मात्र इतर अनेक पुस्तकप्रेमी यूट्यूबर्सना हेवा वाटावा इतका त्याचा वाचनपसारा. त्याचा सर्व वयोगटांतील दर्शकवर्ग गेल्या पाच-सात वर्षांत वाढतोय. याचे पुस्तकवाचन अद्यायावत असतेच. वर त्यांवर तो करीत असलेल्या टिप्पणी आणि टीका गांभीयार्ने घेतल्या जातात. बुकरची दीर्घ यादी येईपावेतो याचे बऱ्याच कादंबऱ्यांचे वाचन उरकले होते. त्याला यादीतील काही कादंबऱ्या इतक्या खटकल्या की त्यावरचा टीका-व्हिडीओच त्याने सादर केला. यात टीका केलेले एक पुस्तक आता लघुयादीतदेखील दाखल झालेय. त्यामुळे या पुस्तकांवरच्या टीकेचे मुद्दे काय आहेत, ते येथे जाणून घेता येतील.

# ट्रम्प, जिमी किमेल आणि गुदगुल्यांचा 'खंजीर'! ही एकी जगभरातील माध्यमांसाठी एक संदेशच...



**अ**मेरिकेतील लोकप्रिय जिमी किमेल शो अचानक बंद पडला आणि चार दिवसांनी पुन्हा सुरू झाला. एका वाक्यात सांगता येणाऱ्या या घटनेने अमेरिकेत एक मोठे वादळ उठले आणि ते लवकर शमेल, अशी काही चिन्हे नाहीत. या वादळाच्या केंद्रस्थानी आहेत, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प (ज्यांचे वर्णन माध्यमे थिन स्कीन्ड किंवा ज्याला गुदगुल्यादेखील खंजिरासारख्या वाटतात असे करतात) आणि अमेरिकेतील खुल्या अभिव्यक्तीचे प्रवक्ते मानले जाणारे लेटनाइट शो. अमेरिकेत या लेटनाइट शोजची मोठी परंपरा आहे. सुरुवातीला आठ-दहा मिनिटे सूत्रधार प्रेक्षकांशी हितगूज करतो, त्यानंतर एक दोन पाहुण्यांच्या मुलाखती घेतो आणि शेवटी गाण्याचा कार्यक्रम सादर करतो.


भारतातही अशा धर्तीवर कार्यक्रम आहेत, पण त्यांचे स्वरूप गप्पाटप्पा आणि विनोद असेच आहे. अमेरिकन लेटनाइट शोजच्या तलवारीची धार भारतात एक क्षणही टिकणार नाही, इतके ते सरकार, राजकारणी, उद्योगपती आणि सेलिब्रिटीजवर बोचरी टीका करतात. ही लेटनाइट शोजची खासियत. या मोकळेपणाला अमेरिकन जनता अमेरिकन असण्याची आवश्यकता मानते. हा देश हे अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य मोठ्या अभिमानाने मिरवतो. डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षस्थानी आल्यापासून, विशेषतः दुसऱ्यांदा निवडून आल्यावर त्यांनी वेळोवेळी दाखवलेल्या बडग्यामुळे तिथले व्यक्तिस्वातंत्र्य जाऊन रशियातल्या ओलिगार्कसारखी ट्रम्पना खुश करून आपल्या तुंबड्या भरणाऱ्या मोजक्या धनदांडग्यांची सत्ता येईल, अशी भीती अमेरिकेत निर्माण झाली आहे.

या मार्गावर अडथळे आहेत लेटनाइट शोज. ट्रम्प सत्तेवर आल्यापासून या शोजच्या सूत्रधारांनी रोज रात्री ट्रम्पवर कडाडून टीका सुरू केली. ट्रम्प यांनीही मग हे शोज संपवण्याचा विडा उचलला. रोज इथले अँकर ट्रम्पच्या धोरणांवर टीका करणार आणि ट्रम्प ट्रूथ सोशलवर या अँकर्सना शिव्या देणार, हे जणू ठरून गेल्यासारखेच झाले. सीबीएस नेटवर्कवर गेली दहा वर्षे चालू असलेला स्टीवन कोलबेयर शो बंद करण्याची नोटीस सीबीएसने कोलबेयरला दिली. त्यांच्यामधील करार नव्याने होणार नाही आणि कोलबेयर शो काही महिन्यांत बंद पडेल. ही घोषणा होताच ट्रम्प यांनी सीबीएसचे अभिनंदन केले आणि त्याचवेळी एबीसीने सीबीएसपासून धडा घेऊन जिमी किमेल शो बंद करावा, अशी धमकीवजा सूचनाही केली. त्या धमकीनंतर गेल्या आठवड्यात एबीसीची मालकी असलेल्या डिस्ने कंपनीने अचानक जिमी किमेल शो स्थगित केला.

चार्ली कर्क या उजव्या विचारसरणीच्या नेत्याच्या हत्येबाबत बोलताना जिमी पातळी सोडून बोलला असे कारण त्याला काढण्यामागे आहे, असे सांगण्यात आले. या घोषणेच्या आधी अमेरिकेच्या टेलिव्हिजन नियामक मंडळाचे (फेडरेशन ऑफ कम्युनिकेशन कमिशन किंवा एफसीसी) अध्यक्ष ब्रेंडन कार यांनी एका पॉडकास्टमध्ये जिमी किमेलवर टीका केली आणि जर डिस्नेने त्याच्यावर काही कारवाई केली नाही तर परिणामांना सामोरे जावे लागेल, अशी उघड धमकी दिली होती. या कारवाईने ट्रम्प महाशय खुश झाले आणि आता एनबीसीने त्यांचा जिमी फॅलन शोही बंद करावा, असे धमकावले. सत्ताधीश फक्त धमकी देत नसतात. सत्तेच्या नाड्यांबरोबरच पैशांच्या नाड्याही त्यांच्या हातात असतात, त्यामुळे ट्रम्प यांच्या दबावाला बळी पडून कोलबेयर आणि किमेल यांचा आवाज बंद केला गेला, असे म्हणणे चुकीचे ठरेल.

किमेल शो सुरू व्हावा म्हणून किमेल, त्याचे वकील आणि डिस्ने आणि त्यांचे वकील यांत जोरदार वाटाघाटी झाल्या. त्यांत काय नेमके झाले, हे अजून स्पष्ट झाले नाही, पण डिस्ने कंपनीने या शोचे निलंबन मागे घेतले. शो थांबविण्याची घोषणा झाल्यावर इतक्या मोठ्या प्रमाणात प्रक्षोभ उसळेल याची कल्पना डिस्नेला नसावी. किमेल शो पुन्हा सुरू झाला, तरी अनेक राज्यांत प्रसारित झाला नाही, कारण नेक्स्टार आणि सिनक्लेयरने आम्ही तो दाखवणार नाही असे जाहीर केले. गंमत म्हणजे असे असले, तरी किमेल परत आला आणि त्याचा पहिला एपिसोड रेकॉर्डब्रेक लोकांनी पाहिला. टीव्ही आणि यूट्यूबवर त्याने रेटिंगचे सगळे विक्रम मोडले. आपल्या परतीच्या एपिसोडमध्ये किमेलने मला चार्ली कर्कच्या हत्येचे गांभीर्य माहीत आहे आणि माझा सर्व प्रकारच्या हिंसेला विरोध आहे, असे सांगत ट्रम्प यांच्यावर पुन्हा जहरी टीका केली. त्याच्या प्रतिस्पर्धी शोजच्या सर्व सूत्रधारांनी, स्टिवन कोलबेयर, जिम फॅलन, सेथ मायर्स, जॉन स्टुवर्ट, जॉन ऑलिव्हर यांनी आपल्या शोजमधून किमेलला उघड समर्थन दिले. त्याचे पुन्हा स्वागतही केले. इतकेच काय तर आपला शो बंद होईल की काय, या चिंतेत न पडता संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत ट्रम्प यांनी केलेल्या भाषणाचा खरपूस समाचारही घेतला. ही एकी जगभरातील माध्यमांसाठी एक संदेशच आहे आणि या संदेशात आहे एक प्रश्न : तुम्हाला राजाचा भाट बनायचे आहे की, राजदरबारातला विदूषक? नागड्या राजाने (न) घातलेल्या कपड्यांचे कौतुक करायचे की, त्याने कपडे घातले नाहीत ही जाणीव राजाला करून द्यायची आहे?

# चिंताजनक 'लडाख फाइल्स'! सोनम वांगचुक यांना देशद्रोही ठरवून तुरुंगात सडविणे दिसते तितके सोपे नाही



**दे**शाच्या एकेका प्रदेशातील घटना-घडामोडी, वदंता व मिथकांवर आधारित निघालेल्या सिनेमांमधील फाइल्स आणि स्टोरीजचे, त्यावर आधारित राजकारणाचे वातावरण सध्या देशात आहे. काश्मीर फाइल्सच्या माध्यमातून खोऱ्यातील पंडितांच्या वेदना मांडल्या गेल्या. केरला स्टोरीजमधून वेगळाच विषय पुढे आला. आता बेंगाल फाइल्सची चर्चा सुरू आहे. अर्थात, हे सारे मनोरंजनाच्या अंगाने जाणारे. प्रत्यक्षात वास्तव आणखी गंभीर असते. प्राचीन संस्कृतीपासून ते सध्याच्या सीमारक्षणापर्यंत सर्वच बाबतीत देशाचा मुकुटमणी शोभावा अशा लडाख प्रदेशातील गेल्या तीन दिवसांमधील घटना चिंताजनक आहेत. लडाखला स्वतंत्र राज्याचा दर्जा आणि पर्यावरणीयदृष्ट्या या संवेदनशील प्रांताला राज्यघटनेतील सहाव्या सूचीद्वारे संरक्षण द्या, खाणमाफियांना आवरा या मागण्यांसाठी दोन वर्षे सुरू असलेल्या आंदोलनाला बुधवारी हिंसक वळण लागले.

चौघांचा बळी गेला. लेह, कारगिल वगैरे देशाला परिचित भागांमध्ये बेमुदत संचारबंदी लावण्यात आली. ज्यांच्या कर्मयोगी शैक्षणिक प्रयोगावर थ्री इडियट्स सिनेमा निघाला व गाजला ते प्रख्यात शिक्षणविद, पर्यावरणविद सोनम वांगचुक यांना सरकारने या हिंसाचारासाठी जबाबदार धरले. सीबीआय, ईडी वगैरे तपास यंत्रणा कामाला लावल्या. वांगचुक यांच्या स्टुडंट्स एज्युकेशनल अँड कल्चरल मूव्हमेंट ऑफ लडाख या सेवाभावी संस्थेचा विदेशी देणग्या स्वीकारण्याचा परवाना तडकाफडकी रद्द केला. या विद्वानाच्याही मागे मनी लॉड्रिंगचे शुक्लकाष्ठ लागले. जेन-झी तरुणांना भडकावल्याच्या आरोपाखाली शुक्रवारी सोनम वांगचुक यांना अटक झाली. केंद्र सरकार आपल्या मागे लागले असून, तुरुंगात सडविण्याचा डाव असल्याचे वांगचुक यांचे म्हणणे आहे. हे खरे असेल तर देशात एक नवा अशांत टापू तयार होतोय, असे म्हणावे लागेल.

ईशान्य भारतातील मणिपूर पावणेतीन वर्षांनंतरही पुरते शांत झालेले नसताना असा नवा अशांत टापू तयार होणे देशासाठी चांगले नाही. वांगचुक यांच्या मागण्या काही जगावेगळ्या नाहीत. त्यासाठी गेली तीन वर्षे ते लढत आहेत. या लढ्याला मुख्यत्वे लडाखच्या पर्यावरणविषयक चिंतेची पार्श्वभूमी आहे. जवळपास निर्मनुष्य वाटाव्या अशा लाखो चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या लडाखमधील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या रक्षणासाठी सहाव्या सूचीची मागणी जुनीच आहे. लडाखला राज्याचा दर्जा ही मागणी नवी आहे. कारण, सहा वर्षांपूर्वी जम्मू-काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे राज्यघटनेचे ३७० कलम हटविण्यात आले आणि दोन केंद्रशासित प्रदेश तयार झाले, तेव्हा केंद्र सरकारने जम्मू-काश्मीर व लडाख या प्रदेशांना यथावकाश स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला जाईल, असे आश्वासन दिले आहेच. लोकशाही व्यवस्थेत अशा मागण्या करणे गैर नाही आणि उपोषण, पदयात्रा अशा गांधीवादी मार्गानेच वांगचुक यांनी या आतापर्यंत मागण्या रेटण्याचा प्रयत्न केला आहे. आधी सरकारने त्यांच्या उपोषणाची अजिबात दखल घेतली नाही. म्हणून त्यांनी लेह ते दिल्ली अशी पदयात्रा काढली. तेव्हा ज्या सिंघू बॉर्डरवर पंजाबमधील आंदोलक शेतकरी रोखले होते तिथेच वांगचुक व सहकाऱ्यांना रोखण्यात आले. सकारात्मक प्रतिसाद सोडा, सरकार चर्चेलाही तयार नाही, हे पाहून ते निराश झाले.

या पार्श्वभूमीवर, हिंसा घडली तरच सरकार किंवा देशाचे लक्ष वेधले जाते, हे कटुसत्य परवाच्या घटनेने पुन्हा सिद्ध झाले. सोनम वांगचुक यांनी जणू सत्तेला आव्हान दिले आहे आणि त्याला तितक्याच कठोरपणे सरकारने प्रतिसाद दिला आहे. तथापि, लडाखबद्दल इतका ढिसाळपणे विचार करणे, जोखीम घेणे देशाला परवडणारे नाही. एकतर हा प्रदेश तिबेट-चीन, पाकव्याप्त काश्मीरच्या सीमांवर आहे.

दोन्ही शेजाऱ्यांच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी तिथल्या जनतेच्या मनात केंद्र सरकारबद्दल आत्मीयता असणे गरजेचे आहे. कारगिल युद्ध, गिलगिट-बाल्टिस्तानचा पेच किंवा गलवान खोऱ्यात चीनच्या आगळिकीवेळी हे आपण तीव्रतेने अनुभवले आहे. जुन्या जम्मू-काश्मीर राज्यात या प्रदेशामुळे एक धार्मिक समतोलदेखील राखला होता. याशिवाय खुद्द सोनम वांगचुक यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची विद्वत्ता, पर्यावरण रक्षणाचे कार्य, हिमस्तुप किंवा सौरऊर्जेचे प्रयोग, भारताने तसेच जगाने दखल घेतलेले शैक्षणिक प्रयोग, त्यासाठी मिळालेले रेमन मॅगसेसे यांसारखे पुरस्कार या सगळ्यांचा विचार करता त्यांना देशद्रोही ठरवून इतरांसारखे तुरुंगात सडविणे दिसते तितके सोपे नाही.

# उपनगरीय लोकल प्रवास खरंच सुखकर होईल का?

**दे**शात पहिली लोकल सुरू होऊन 172 वर्षे पूर्ण झाली, यानंतर मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे या जिल्ह्यांचा झालेल्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रवासाचे साधन म्हणजे रेल्वेची ही लोकल आहे. लोकलमुळे सर्वसाधारण माणसाला मुंबई कळली आणि रोजगाराचे साधनदेखील मिळाले, पण आता या लोकलचा प्रवास मुंबई ते ठाणेपर्यंत राहिला नसून तो दूरवर पसरला आहे. याच लोकल मार्गावरून आता देशभरात रेल्वेगाड्या जात आहेत. मोठ्या प्रमाणात रेल्वे प्रशासनाला उत्पन्न मिळत आहे. आता सद्य परिस्थितीत लोकलमधून दररोज लाखो प्रवासी ये-जा करत प्रवास करत आहेत. पण लोकल गाड्यांच्या डब्यामध्ये होणारी गर्दी काही केल्या कमी होत नाही, याचा परिणाम दररोज एक प्रवासी लोकलमधून पडून मृत्यू होत असल्याचे समोर येत आहे. रेल्वे प्रशासन लोकल गाड्या वाढवण्याकडे भर देत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने तुरळक प्रमाणात वातानुकूलित रेल्वेगाड्यादेखील सुरू करण्यात आल्या आहेत. रेल्वेचे दरवाजे उघडे असल्याने अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. काही महिन्यापूर्वीच मुंब्रा रेल्वे स्थानक वळणावरील दोन रेल्वे गाड्यांच्या दरवाजात उभे असलेले प्रवासी खाली पडून मोठा अपघात घडला होता. यानंतर रेल्वे प्रशासनाने मुंब्रा रेल्वे स्थानकाच्या जवळील रुळाच्या वळणावर रेल्वेचा वेग कमी केला. यानंतर राज्य शासनानेदेखील रेल्वेच्या गाड्यांचे दरवाजे बंद करून नवीन रेल्वेगाड्या प्रवाशांच्या सेवेत सुरू करण्यात येतील असे आश्वासन दिले. तसेच नवीन वातानुकूलित रेल्वे गाड्यादेखील रेल्वे मार्गावर वाढवण्यात येतील, असे सांगण्यात आले. पण सद्यस्थितीत प्रवाशांचा गुदमरून प्रवास आजही सुरूच आहे. याची रेल्वे प्रशासनाने गंभीर दखल घेऊन गर्दी कमी कशी होईल, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कल्याण यार्डाचे सुरू असलेले काम अजूनही पूर्ण झाले नाही, कल्याण ते कसारा-कर्जत मार्गावर रेल्वे लोकलकरिता नागरिकांना आजही तासनतास वाट पाहत राहावे लागत आहे. रेल्वेची फ्रिक्वेन्सी वाढवण्याकरिता कल्याण यार्डाचे युद्धपातळीवर काम करून कल्याण कसारा-कर्जत शटल सेवा रेल्वेने सुरू करणे आवश्यक आहे. मुळात मध्य रेल्वेच्या मार्गावर आतापर्यंत कित्येक जण मुख्य व्यवस्थापक पदावर विराजमान झाले आहेत. पण रेल्वे प्रवाशांना सुखकर प्रवास अद्यापही देण्याकडे रेल्वे अधिकार्यांची उदासीनता दिसून येत असल्याचे प्रवासी सांगत असतात. रेल्वे प्रशासन केंद्राच्या अखत्यारित येते, पण रेल्वेची लोकल सेवा कधी सुधारणार, असा प्रश्न देखील सर्वसामान्य प्रवाशांना पडतो, रेल्वेने अवघ्या एक रुपयात सुरू केलेले वन रुपी क्लिनिक (रेल्वे आरोग्य केंद्र) बंद झाल्याने प्रवाशांना विशेष करून महिला प्रवाशांना भोवळ आल्यास उपचार मिळणे कठीण झाले आहे. वन रुपी क्लिनिकचा फायदा मोठ्या प्रमाणात लोकल प्रवाशांना झाला होता, पण रेल्वेचे आरोग्य खाते पुन्हा हे वन रुपी क्लिनिक सुरू करण्याकडे का लक्ष देत नाही? असा देखील प्रश्न प्रवाशांना पडला आहे.

रेल्वे प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा, याकरिता रेल्वे मंत्रालयाने 238 नव्या वातानुकूलित लोकल खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनची पाहणी करत असताना प्रसार माध्यमांशी बोलताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले होते की, मुंबईच्या उपनगरीय रेल्वेमार्गावर दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात, यामुळे सध्या धावर्णाया जुन्या लोकल गाड्यांनाही ऑटोमॅटिक डोअर क्लोजिंग बसवली जाणार आहे, तंत्रज्ञानाच्या मदतीने जुन्या गाड्यांचेदेखील आधुनिकीकरण केले जाईल, असे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले होते. तसेच रेल्वेमंत्र्यांनी असेही सांगितले होते की, नव्याने बनर्णाया सर्व वातानुकूलित लोकल गाड्यामध्ये स्वयंचलित प्रणालीसाठी स्वतंत्र तरतूद केली आहे. पहिली अशा स्वरूपाची आधुनिक लोकल पुढील वर्षांपासून प्रवाशांच्या सेवेत दाखल होणे आवश्यक आहे. सध्या फक्त एसी लोकलमध्येच ही सुविधा उपलब्ध आहे, लवकरच मुंबईच्या एसी लोकलचे स्वरूप बदललेले दिसेल, असे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले होते.

इंट्रिगल कोच फॅक्टरीला सर्व नॉन एसी गाड्या नव्याने बनवण्याचे काम देण्यात आले आहे, यात स्वयंचलित दरवाजासोबत व्हेंटिलेशनची व्यवस्थादेखील आहे, या संपूर्ण प्रकल्पासाठी मुंबई विकास कार्पोरेशनने सुमारे 21 हजार कोटी रुपयांचे वातानुकूलित वंदे मेट्रो कोच खरेदी करण्यासाठी जागतिक निविदा काढण्यात आली असल्याचे रेल्वे अधिकारी सांगत आहेत. सध्या सकाळी कार्यालयीन वेळेत जार्णाया प्रवाशांना अक्षरशः घुसमटत धक्के खात प्रवास करावा लागत आहे, यामध्ये कित्येक प्रवासी जखमी होतात, पण जखमी प्रवाशांना वेळीच उपचार मिळणे रेल्वे स्थानकात कठीण झाले आहे. महिला प्रवाशांकरिता डबे कमी असल्याने महिला प्रवाशांची मोठी कुचंबणा होत आहे. प्रवाशांच्या सुखकर प्रवासाकरिता रेल्वेने कुर्ल्यावरून पाचवी, सहावी लाईन लवकरात लवकर पूर्ण करावी, 16 लोकल गाड्या ठाण्यावरून कर्जत, कसारा, टिटवाळ्याला सोडणे आवश्यक आहे. पारसिक बोगद्यातून पाचवी, सहावी लाईनवरून कल्याण ते वाशी लोकल सुरू केली तर गर्दी कमी होऊ शकते. दिवा, मुंब्रा, कळवा या रेल्वे स्थानकावर प्रचंड गर्दी होते.

# माता कालरात्रि

माता कालरात्रि ही नवरात्रीच्या सातव्या दिवशी पूजा केली जाणारी दुर्गेची सातवी क्रूर रूप आहे. तिच्या नावाचा अर्थ 'कालाचा मृत्यू' (वेळ आणि मृत्यू) आहे आणि ती अंधार, अज्ञान, वाईट शक्ती आणि भीती नष्ट करण्यासाठी पूजनीय आहे. तिचे भयानक स्वरूप असूनही, तिला शुभंकारी म्हणून देखील ओळखले जाते, ज्याचा अर्थ 'शुभ' आहे, कारण ती अडथळे दूर करते आणि तिच्या भक्तांना धैर्य आणि संरक्षण देते.

माता कालरात्रिचे प्रमुख पैलू

रूप: तिचा रंग काळा आहे, लांब, अनियंत्रित केस आहेत आणि तीन तेजस्वी डोळे आहेत. ती गाढवावर स्वार होते, जी नम्रता आणि सर्वांसाठी सुलभतेचे प्रतीक आहे.

हात आणि गुणधर्म : तिचे चारही हात तलवार, एक घातक लोखंडी हुक धरतात आणि अभय (निर्भयता) आणि वरद (वरदान देणारी) मुद्रा किंवा हाताचे हावभाव प्रदर्शित करतात.

नवरात्रीतील भूमिका: दैवी मातेचे सातवे रूप म्हणून, कालरात्रि अज्ञानाच्या अंधारावर प्रकाशाचा विजय आणि आव्हानांवर मात करण्याची शक्ती दर्शवते.

शक्ती आणि आशीवार्द : नकारात्मक ऊर्जा आणि वाईट शक्तींचा नाश करण्यासाठी तिची पूजा केली जाते आणि तिचे आशीर्वाद भयमुक्ती आणि हानीपासून संरक्षण प्रदान करतात.

प्रतीकात्मकता: तिचे गडद रूप निसर्गाच्या विनाशकारी पैलूचे प्रतीक आहे जे जगाच्या अशुद्धतेला दूर करते.

पूजा आणि महत्त्व

कालरात्रीची पूजा केल्याने भक्तांना त्यांच्या भीती आणि आव्हानांवर मात करण्यास मदत होते, ज्यामुळे ती आध्यात्मिक मुक्ततेचे एक शक्तिशाली प्रतीक बनते.

काही परंपरेनुसार, तिला शनि ग्रहाचे नियंत्रण करणारी देवता मानली जाते.

तिची पूजा अनुयायांना आठवण करून देते की बाह्य स्थितीपेक्षा आंतरिक शक्ती आणि भक्ती अधिक महत्त्वाची आहे.



# नवरात्रीत कन्यापूजन करताना या वस्तू देणे ठरते शुभ

नवरात्रीत कन्यापूजनाला विशेष महत्त्व असते. या दिवशी मुलींना घरी बोलावून त्यांची ओटी भरून त्यांना जेवायला घातले जाते. कन्यापूजन हे देवीची सेवा असल्याचे मानले जातात. कन्यापूजन करताना मुलींना काही वस्तू देणे शुभ मानले जाते. असे म्हंटले जाते की नऊ दिवसांचे पूजन हे कन्यापूजनाशिवाय अपूर्ण आहे. नवरात्रीमध्ये काहीजण कन्यापूजन अष्टमीला तर काहीजण नवमीला करतात. कन्यापूजन करताना मुलींना देवीचे स्वरुप समजले जाते.

शृंगाराच्या वस्तू

नवरात्रीत कन्या पूजन केल्यानंतर, मुलींना शृंगाराच्या वस्तू द्याव्या.

तांदूळ

नवरात्रीत मुलींची तांदळाने ओटी भरावी. यामुळे घरात अन्नधान्याची कमतरता भासणार नाही. तसेच घरात समृद्धी येते.



फळे

नवरात्रीत कन्याभोजासाठी येणाऱ्या मुलींना फळे द्यावीत. यामुळे तुमच्या चांगल्या कर्मांच्या फळात वाढ होते. मुलींना केळी आणि नारळ देऊ शकता. केळी हे भगवान विष्णूचे आवडते फळ मानले जाते आणि नारळ हे देवी लक्ष्मीचे आवडते फळ आहे. हे दोन्ही फळे दान केल्याने तुमच्या जीवनात सकारात्मक परिणाम होतील.

मिठाई

मुलींना गोड पदार्थ देणे चांगले असते. घरात गोड पदार्थ बनवून देवीला नैवेद्य दाखवावा आणि नंतर मुलींना खायला द्यावे.

नाणी

कन्यापूजनाच्या वेळी मुलींना सुट्टी नाणी द्यावीत. यामुळे देवी लक्ष्मीचा आशीर्वाद मिळतो. असे म्हटले जाते की मुलींना नाणी दिल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते.

लाल वस्त्र

नवरात्रीत तुम्ही कन्या भोजनाचे आयोजन करत असाल तर तुम्ही मुलींना लाल कपडे किंवा लाल ओढणी द्यावी. लाल रंग समृद्धीचे प्रतीक आहे. तसेच लाल रंग हा देवीचा आवडता रंग आहे.

कन्या पूजन कसे करावे?

कन्या पूजनाच्या एक दिवस आधी सर्व मुलींना घरी आमंत्रित करा. नऊपेक्षा जास्त मुलींना आमंत्रित करणे शुभ असते.

कन्या पूजनासाठी शिरा आणि पुरीचा प्रसाद बनवावा.

मुली घरी आल्यावर त्यांचे पाय पाण्याने धुवा.

नंतर त्यांच्या पायावर कुंकवाने स्वस्तिक काढावा.

नंतर मुलींना हळद, कुंकू लावून त्यांची ओटी भरावी.

नंतर त्यांना जेवायला घालावे.

शेवटी मुलींच्या पाया पडून त्यांना निरोप द्यावा.

# शीर नसलेल्या देवीची मूर्ती असलेले छिन्नमस्ता मंदिर

झारखंडच्या राजरप्पामध्ये देवीचे एक अनोखे मंदिर आहे. या मंदिरात शिर नसलेल्या देवीच्या मूतीर्ची पूजा केली जाते. छिन्नमस्ता देवी मंदिर हे या मंदिराचे नाव आहे. या मंदिरात दर्शन घेतल्यावर भाविकांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात अशी मान्यता आहे. त्यामुळे केवळ नवरात्रीचा काळ नव्हे तर वर्षभर या मंदिरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. झारखंडची राजधानी रांचीपासून 80 किलोमीटर अंतरावर हे मंदिर आहे.

पौराणिक कथा


पौराणिक कथेनुसार, एकदा देवी भगवती तिच्या सखी जया आणि विजयासोबत नदीत स्नान करत असताना त्यांना अचानक खूप भूक लागली आणि त्यांनी जेवण मागितले. तेव्हा देवीने त्यांना वाट बघायला सांगितली. मात्र आपल्या सखींना भूक सहन न झाल्याने देवीने तलवारीने आपले शीर कापले आणि तिच्या मानेतून रक्ताच्या तीन धारा वाहू लागल्या. यापैकी दोन धारेने तिने सखींची भूक भागवली आणि एक धारा स्वतः ग्रहण केली.

कशी आहे मूर्ती?


या मंदिराच्या गाभाऱ्यात असलेल्या देवीच्या उजव्या हातात तलवार आणि डाव्या हातात देवीचे स्वतःचे कापलेले शीर आहे. तिच्या मानेतून तीन रक्ताच्या धारा वाहत आहेत. देवीचा एक डावा पाय समोर असून तो कमळाच्या फुलावर आहे. तर दुसऱ्या पायाखाली कामदेव आणि रतीच्या प्रतिमा आहेत. तिच्या गळ्यात कवटीचा हार, सापांचा हार आहे. देवीचे केस मोकळे आणि विस्कटलेले असून तिच्या दोन्ही सख्या शेजारी आहेत.

६००० वर्षे जुने मंदिर

हे मंदिर ६००० वर्षे जुने असल्याचे म्हंटले जाते. मंदिर परिसरात महाकाली मंदिर, सूर्य मंदिर, दास महाविद्या मंदिर, बाबाधाम मंदिर, बजरंगबली मंदिर, शंकर मंदिर आणि विराट रूप मंदिर अशी एकूण सात मंदिरे आहेत. दरवर्षी मोठ्या संख्येने साधू, महात्मा आणि भक्त नवरात्रोत्सवात सहभागी होण्यासाठी मंदिरात येतात.



# नवरात्रीमध्ये घरातील झाडू बदल्यास घडेल चमत्कार, जाणून घ्या त्यामागचं रहस्य



नवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर घरातील झाडू बदलण्याची परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे, नवरात्रीला झाडू बदलने ही केवळ एक प्रथा नाहीये, तर यामुळे घरात सकारात्मक ऊजेर्ची निर्मिती होते, तसेच माता लक्ष्मीचा आशीर्वाद सदैव आपल्यासोबत राहातो. वास्तू तज्ञ आणि धार्मिक विद्वानांच्या मते नवरात्रीच्या दिवसांत झाडू बदलल्यामुळे घरात सुख, शांती आणि समृद्धी येते, तसेच उत्तम आरोग्य लाभतं.

घरातील साफसफाई आणि ऊजेर्चा संबंध

नवरात्रीच्या दिवसांमध्ये घरातील साफसफाईचं विशेष महत्त्व आहे. त्यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा येते, लक्ष्मी मातेचा आशीर्वाद मिळतो, घरातील सर्व प्रकारच्या अडचणी दूर होतात. जुन्या झाडूमध्ये वर्षभर नकारात्मक ऊर्जा जमा होते,

त्यामुळे त्या झाडूला बदललं जातं, नवरात्रीमध्ये घरात नवीन झाडू खरेदी केला जातो. आता नवरात्रीमध्ये झाडू कधी बदलावा? असा प्रश्नही अनेकांना पडतो. तर याचं उत्तर म्हणजे अमावस्या किंवा शनिवारी झाडू बदललं किंवा घरात नवीन झाडू आणणं हे शुभ मानलं जातं. या दिवशी घरात नवीन झाडू आणल्यास घरातील गरिबी दूर होते, घरात सुख, शांती, समृद्धी आणि धनाचं आगमन होतो. सोबतच कुटुंबातील व्यक्तींना उत्तम आरोग्य लाभतं.

नवीन झाडू कधी खरेदी करावा?

धर्मशास्त्रानुसार नवरात्रीमध्ये झाडू बदलनं हे अत्यंत शुभ मानलं जातं. झाडू बदलल्यामुळे घरात सुख, शांती आणि समृद्धी येते. झाडू हा अमावस्येला किंवा शनिवारी खरेदी करावा तसेच तो सकाळी खरेदी करू नये तर सायंकाळच्या वेळी खरेदी करावा असं वास्तुशास्त्र सांगतं, जुना झाडू बदलल्यामुळे तुमच्या घरातील सर्व नकारात्मक ऊर्जा नष्ट होते, तर नव्या झाडूसोबत घरात सकारात्मक ऊर्जा प्रवेश करते असं मानलं जातं. त्यामुळे नवरात्रीला झाडू बदलण्याची प्रथा आहे, वास्तुशास्त्र आणि धर्मशास्त्रामध्ये देखील याचे अनेक फायदे सांगण्यात आले आहेत.

# मासिक पाळी येताच झाडाशी लावतात लग्न, भारतात पाळली जाते विचित्र प्रथा



भारतात अजूनही अनेक प्रथा आणि परंपरा पाळल्या जातात. काही ठिकाणी मुलींना मासिक पाळी आल्यावर वेगवेगळ्या प्रथा पाळल्या जातात. पण भारतात एक असे ठिकाण आहे जिथे मुलींना मासिक पाळी आल्यावर एक विचित्र प्रथा पाळली जाते. ती म्हणजे मुलींना मासिक पाळी आल्यावर त्यांचे लग्न झाडाशी लावले जाते.

आसामची विचित्र प्रथा

ही परंपरा आसामच्या काही भागात पाळली जाते. जेव्हा एखाद्या मुलीला पहिली पाळी येते तेव्हा तिला चार दिवस बाजूला बसवले जाते. त्यानंतर तिचे लग्न केळीच्या झाडाशी केले जाते. विशेष म्हणजे मोठ्या थाटामाटात हे लग्न केले जाते. या प्रथेला ह्वटोलिनी विवाहह्व असे म्हंटले जाते. ही परंपरा आसाममधील बोगाईगाव जिल्ह्यातील सोलमारी इथे आजही पाळली जाते.

हे लग्न करताना मोठा उत्सव आयोजित करण्यात येतो, ज्यामध्ये नृत्य आणि संगीत देखील असते. मुलीचे संपूर्ण कुटुंब देखील या उत्सवात सहभागी होते. असे म्हटले जाते की या काळात मुलीला फक्त फळे खायला दिली जातात. मग लग्न झाल्यावर ती पुन्हा सामान्य जीवन जगते.

मासिक पाळीच्या काळात होणारे हे लग्न मुलीचे पहिले लग्न मानले जाते. मग जेव्हा मुलगी मोठी होते तेव्हा योग्य वर शोधून तिचे लग्न लावले जाते. ही एक परंपरा आहे जी अनेक वर्षांपासून चालत आली आहे आणि आजही पाळली जात आहे.

# नवरात्रीत 'ही' एक वस्तू घरात आणल्यामुळे आर्थिक चणचण होईल दूर...

नवरात्रीचा शुभ मुहूर्त केवळ देवीची पूजा करण्यासाठीच नव्हे तर तुमच्या घरात आणि जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्यासाठी देखील मानला जातो. अशा वेळी श्रीयंत्र घरात ठेवल्याने जीवनात समृद्धी, यश आणि मानसिक शांती येते. नवरात्रीच्या पवित्र दिवसांमध्ये घरात श्रीयंत्र असणे केवळ आध्यात्मिकच नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरते. हे घरात समृद्धी आणि आनंद आणि शांती आणते आणि देवी लक्ष्मीची कृपा कायम ठेवते. श्री यंत्र ही एक पवित्र भौमितिक आकृती आहे जी देवी लक्ष्मीचे प्रतीक मानली जाते. हा नऊ त्रिकोणांचा निदेर्शांक आहे, ज्याचा बिंदू मध्यभागी आहे. ध्यान आणि मंत्रांनी याची स्थापना करून घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि नकारात्मक प्रभाव दूर होतो.

नवरात्रीचे विशेष महत्त्व

विशेषतः नवरात्रीत, ते स्थापित केल्याने ही ऊर्जा आणखी शक्तिशाली होते. या काळात शक्ती देवी अधिक सक्रिय मानली जाते. मंत्रोच्चार आणि स्वच्छतेसह घरात ठेवल्याने संपत्ती, व्यवसायात वाढ, करिअरमध्ये यश आणि आनंद मिळतो.

लाभ कसा मिळवायचा?

संपत्ती आणि समृद्धी : श्रीयंत्र घरात ठेवल्याने आर्थिक अडचणी दूर होतात आणि उत्पन्नाचे नवीन स्त्रोत खुले होतात.

सकारात्मक ऊर्जा : नकारात्मक शक्ती आणि तणाव टाळते.

यश आणि आदरः व्यवसाय आणि नोकरीत प्रगतीचा मार्ग खुला करते.

आध्यात्मिक फायदे : मानसिक शांती आणि एकाग्रतेची खोली वाढते.

स्थापनेची पद्धत

श्रीयंत्र स्वच्छ आणि शांत ठिकाणी ठेवा.

ते पांढऱ्या किंवा लाल कपड्यावर ठेवा आणि देवी लक्ष्मी ॐ श्रीम ह्रीं श्रीम कमलाये प्रसिद्ध प्रसिद्ध श्रीम ह्रीं श्रीम ॐ या मंत्राचा जप करा.

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी याची स्थापना करणे शुभ मानले जाते.

ते घराच्या मुख्य भागात किंवा पूजा खोलीत ठेवा आणि दररोज ध्यान आणि मंत्रोच्चार करत रहा. असे केल्याने केवळ आर्थिक फायदाच नव्हे तर मानसिक संतुलन आणि घरात सकारात्मक वातावरणही येते.

# नवरात्रीमध्ये दान धर्म केल्यामुळे नेमकं काय होते?



हिंदू धर्मामध्ये देवीची पूजा करणे शुभ मानले जाते. नवरात्रीमध्ये देवीची पूजा केल्यामुळे तुमच्या जीवनातील सर्व समस्या दूर होण्यास मदत होते. अनेक भक्त नवरात्रीमध्ये उपवास करतात ज्यामुळे त्यांच्या आयुष्यामध्ये सकारात्मकता येते. नवरात्रीचा पवित्र सण हा माता दुर्गाच्या पूजेचा काळ असतो. या नऊ दिवसांत मातेच्या नऊ वेगवेगळ्या रूपांची पूजा केली जाते. नवरात्रीची सांगता कन्यापूजनाने होते, जी शक्ती आणि समृद्धीचे प्रतीक मानली जाते. कन्यापूजनात तरुण मुलींची दुर्गा मातेचे रूप म्हणून पूजा केली जाते, त्यांना खाऊ घातले जाते आणि नंतर निरोप देताना दक्षिणा दिली जाते. दक्षिणा देण्याची ही परंपरा केवळ एक संस्कार नाही, तर त्यामागे खोलवर धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व दडलेले आहे.

पंचांगानुसार यंदाचे शारदीय नवरात्र 22 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या कालावधीत साजरे केले जाईल. यावेळी अष्टमी आणि नवमी या दोन्ही तिथींना कन्यापूजेचा शुभ योगायोग आहे. आपल्या परंपरेनुसार तुम्ही 30 सप्टेंबर (अष्टमी) किंवा 1 ऑक्टोबर (नवमी) रोजी कन्या पूजा करू शकता.

कन्यापूजेनंतर दक्षिणेचे महत्त्व

आदर आणि कृतज्ञतेचे प्रतीक - जेव्हा आपण एखाद्याच्या घरी पाहुणे म्हणून जातो किंवा कोणी चांगले काम करते तेव्हा आपण धन्यवाद म्हणतो. त्याचप्रमाणे, जेव्हा आपण मुलींना दुर्गा मातेच्या रूपात आपल्या घरी आमंत्रित करतो, तेव्हा त्यांची पूजा करून दक्षिणा देऊन त्यांच्याप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांच्या आगमनाबद्दल आणि आशीवार्दाबद्दल आपण मनापासून कृतज्ञ आहोत याचे ही दक्षिणा प्रतीक आहे.

दान आणि पुण्य यांचे फळ - धार्मिक ग्रंथांनुसार दानाला विशेष महत्त्व आहे. मुलींना दक्षिणा म्हणून पैसे किंवा कोणतीही वस्तू देणे हे एक प्रकारचे दान मानले जाते. हे दान थेट दुर्गा मातेच्या चरणी अर्पण केले जाते. असे मानले जाते की यामुळे घरात सुख-समृद्धी येते आणि दुर्गा मातेच्या कृपेने सर्व मनोकामना पूर्ण होतात.

परंपरा पाळत - कन्यापूजेची परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे. दक्षिणा देणे हा या परंपरेचा अविभाज्य भाग आहे. हा केवळ पैसा किंवा भेटवस्तू नाही, तर आपल्या संस्कृतीचा आणि संस्कारांचा भाग आहे. ते सोडून देऊन आपण आपला सांस्कृतिक वारसा जिवंत ठेवतो. ही दक्षिणा त्या लहान मुलींनाही आनंद देते, ज्या दुर्गा मातेचे रूप आहेत.

आध्यात्मिक फायदे - मुलींना दक्षिणा दिल्याने पूजेचे फळ पूर्ण होते. असे मानले जाते की कोणतीही पूजा किंवा विधी दक्षिणाशिवाय अपूर्ण राहते. दक्षिणा दिल्याने देवी-देवतांचा आशीर्वाद मिळतो आणि पूजेचे पूर्ण फळ मिळते.

दक्षिणामध्ये काय दिले पाहिजे?

कन्यापूजेनंतर पेन्सिल बॉक्स, पुस्तके, खेळणी, कपडे किंवा इतर उपयुक्त वस्तू अशा आपल्या श्रद्धा आणि क्षमतेनुसार दक्षिणा देऊ शकता. दक्षिणासोबत मिठाई किंवा फळे देणे देखील शुभ मानले जाते. दुसरीकडे, जर तुम्ही कोणत्याही कारणास्तव घरी कन्या पूजा करू शकत नसाल तर तुम्ही मंदिरात जाऊन माता राणीला भोग घालू शकता.

# नवीन ट्रेंड्स फॉलो करणाऱ्यांनो सावधान! तुम्हीही 'तो' फोटो शेअर केला का ?; समोर आलं मोठं संकट

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**



स्वतःचे हटके आणि सुंदर फोटो तयार करण्यासाठी अनेक जण आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय)चा वापरत आहेत. मात्र, याच एआयचा वापर चुकीच्या मार्गाने होऊ लागल्याने गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः इंटरनेटवरून फोटो उचलणे आणि त्यांचा गैरवापर करणे हे एक मोठे संकट बनत चालले आहे. त्यामुळे काळजी घेण्याचे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे. एआयच्या साहाय्याने आता कुणाचाही फोटो अत्यंत अचूकतेने बदलता येतो. एआय टूल्सच्या मदतीने चेहरा दुसऱ्याच्या शरीरावर लावणे, बनावट फोटो तयार करणे किंवा अश्लील स्वरूपात फोटो मॉडिफाय करणे हे सहज शक्य झाले आहे. हे फोटो सोशल मीडियावर शेअर केल्यास संबंधित व्यक्तीच्या प्रतिष्ठेला मोठा धक्का बसू शकतो. काय काळजी घ्यायल? नेहमी अधिकृत प्लॅटफॉर्मचा वापर करा. कोणतेही ॲप वापरण्यापूर्वी त्याबाबत युजर्सचे रिव्ह्यू आणि रेटिंग तपासा. वेबसाइट उघडल्यानंतर, फेक वेबसाइटवर येऊ नये म्हणून त्याची यआरएल काळजीपूर्वक तपासणे गरजेचे आहे. कधीही संवेदनशील किंवा वैयक्तिक फोटो अपलोड करू नका. कोणत्याही सोशल मीडिया ट्रेंडला आंधळेपणाने फॉलो करू नका. हे तुमच्यासाठी नुकसानदायक ठरू शकते, असे आवाहन वेळोवेळी सायबर पोलिसांकडून करण्यात येत आहे. विनापरवानगी वापर खासगी आयुष्य धोक्यात येण्याची भीती आहे. अनेकवेळा व्यक्तीची परवानगी न घेता त्यांचे फोटो वापरले जातात. यामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. फोटोच्या साहाय्याने फसवणूक, ब्लॅकमेलिंग किंवा सामाजिक बदनामी अशा घटनाही उघडकीस येत आहेत. ... तर ब्लॅकमेलिंगची धास्ती तुमचा डेटा चुकीच्या व्यक्तीला मिळाल्यास त्याचा गैरवापर होऊ शकतो. फसवणुकीसाठी बनावट प्रोफाइल तयार केली जाऊ शकते. तुमच्या चेहऱ्याचा वापर करून अश्लील फोटो किंवा व्हिडीओही तयार केले जाऊ शकतात. आर्थिक फसवणूक आणि ब्लॅकमेलिंगचा धोका सुद्धा वाढतो. डेटा लिक होण्याची भीती नवीन ट्रेंड्स फॉलो करणाऱ्या युझर्सना त्यांची निष्काळजी महागात पडू शकते. सायबर गुन्हेगार फेक ॲप्स, वेबसाइटद्वारे युझर्सची खासगी माहिती तसेच फोटोचा गैरवापर करण्याचा धोका अधिक आहे. सर्रास आपले फोटे सोशल मीडियावर शेअर करू नका.



# अमली पदार्थ विक्रेत्याचा पोलिसांवर चाकूने हल्ला; दोन पोलीस जखमी

■ **मुंबई। प्रतिनिधीः**

कोट्यवधी रुपयांच्या अमली पदार्थांचे प्रकरण उघडकीस आणणाऱ्या साकीनाका पोलिसांच्या पथकावर एका अंमली पदार्थ विक्रेत्याने चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात एका पोलीस उपनिरीक्षक व एका पोलिस शिपायाला किरकोळ दुखापत झाली. हल्ल्यानंतर आरोपीने स्वतःवरही वार करण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. अकीन खान (२७) असे आरोपीचे नाव आहे.

कोट्यवधींचे अमली पदार्थ जप्त - साकीनाका पोलिसांनी अंमली पदार्थ विक्रीचे जाळे उघडकीस आणले होते. एप्रिल महिन्यात साकिनाका पोलिसांनी वसई पूर्वेच्या कामण येथे अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या तिघांना अटक केली होती. त्यांच्याकडून ४ किलो ५३ ग्रॅम वजनाचे ८ कोटी रुपयांचे एमडी (मॅफेड्रॉन) हे अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. या प्रकरणात सलीम शेख उर्फ सलीम लंगडा (४५) या मुख्य आरोपीला अटक केली होती. त्याने दिलेल्या माहितीवरून कर्नाटकच्या म्हैसूर येथे छापा टाकून १८७ किलो एमडी हे अमली पदार्थ जप्त केले. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार एकूण किंमत ३८१ कोटी रुपये आहे. याप्रकरणात मुंबईतील आतिक खान (२७) याचा समावेश असल्याची माहिती मिळाली होती. पोलिसांवर अचानक हल्ला आतिक खान (२७) नावाचा आरोपी अंधेरी परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार बुधवार २४ सप्टेंबर रोजी पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी डी.एन. नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचला. त्याला पकडण्याचा प्रयत्न करताच आतिकने त्याच्याकडील चाकू काढून पोलिसांना धमकावले व हल्ला केला. या झटापटीत उपनिरीक्षक शशिकांत पाटील (५१) आणि पोलीस शिपाई पंकज परदेशी (३८) यांना किरकोळ दुखापत झाली.

अखेर पोलिसांनी आरोपीवर नियंत्रण मिळवून त्याला अटक केली. आरोपी आतिक खान याला न्यायालयाने त्याला १० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांवर हल्ल्याच्या वाढत्या घटना

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात, विशेषतः मुंबई आणि उपनगरांत, पोलिसांवर हल्ल्यांच्या घटना वाढल्या आहेत. या हल्ल्यांमध्ये अमली पदार्थांच्या कारवायांदरम्यान, दारू व मटका विरोधी कारवाईत, तसेच वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करताना पोलिसांवर वारंवार हल्ले झाल्याची नोंद आहे. धारदार शस्त्राने वार करणे, दगडफेक, काठी किंवा लोखंडी सळईने मारहाण केली जाते. अटक करताना विरोध व पोलिसांना धमकावणे, गस्ती दरम्यान अचानक हल्ला करणे अशा प्रकारे हल्ले करण्यात येतात.

# दुरुस्तीच्या कामासाठी रेल्वेचा मेगाब्लॉक; तिन्ही मार्गांवर आज होणार 'प्रवासखोळंबा'



■ **मुंबई। प्रतिनिधीः**

दुरुस्ती आणि अन्य कामांसाठी तिन्ही उपनगरीय रेल्वे मार्गांवर रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेवर विद्याविहार आणि ठाणे स्थानकांदरम्यान पाच आणि सहाव्या मार्गिकांवर तसेच ठाणे आणि वाशी /नेरूळ स्थानकांदरम्यान अप आणि डाउन ट्रान्स-हार्बर मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे, तर पश्चिम रेल्वेवर चर्चगेट आणि मुंबई सेंट्रल दरम्यान मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवाशांचा खोळंबा होणार आहे.

मध्य रेल्वे

विद्याविहार आणि ठाणे दरम्यान पाचव्या आणि सहाव्या मार्गावर सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत

परिणाम : १४ मेल / एक्स्प्रेस जलद मार्गावर. त्या १० ते १५ मिनिटांच्या उशिराने धावतील.

ठाणे आणि वाशी / नेरूळ दरम्यान अप व डाउन ट्रान्स-हार्बर मार्गावर सकाळी ११.१० ते दुपारी ४.१० पर्यंत

परिणाम : वाशी / नेरूळ आणि ठाणे दरम्यान ट्रान्स-हार्बर मार्गावरील सेवा रद्द राहतील.

पश्चिम रेल्वे

चर्चगेट ते मुंबई सेंट्रल दरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी १०.३५ ते दुपारी ३.३५ पर्यंत

परिणाम : अप आणि डाऊन धीम्या मार्गावरील सेवा जलद मार्गावर वळविणार.

# आता आठ नगरपालिकांमध्येही झोपडपट्टी पुनर्वसन योजना!

■ **मुंबई। प्रतिनिधीः**



मुंबई-ठाण्यानंतर पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूरपाठोपाठ आता मुंबई महानगरातील आठ नगरपालिकांमध्येही झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येणार आहे. यामध्ये अंबरनाथ, बदलापूर, खोपोली, कर्जत, पालघर, अलिबाग, पेण, माथेरान या नगरपालिकांचा समावेश आहे. याशिवाय बोईसर ग्रामपंचायत परिसरातही झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू करण्यात येणार आहे. याबाबत नगरविकास विभागाने अलीकडे अधिसूचना जारी करून हरकती व सूचना मागविल्या आहेत. यामुळे मुंबई महानगरातील सर्वच परिसरात झोपडपट्टी पुनर्विकास योजना लागू होणार आहेत. यासाठी राज्यासाठी लागू असलेल्या एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत सुधारणा करण्यात येणार आहे. सुरुवातीला झोपडपट्टी पुनर्विकास योजना फक्त मुंबईसाठी लागू होती. त्यानंतर ही योजना पुणे व ठाण्यासाठी लागू करण्यात आली. या पाठोपाठ नागपूर व आता आठ नगरपालिकांना लागू करण्यात आली असली तरी सर्वच महापालिकांमध्ये ही योजना लागू करण्याचा शासनाचा विचार असल्याचे नगरविकास विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

मुंबईवगळता अन्य महापालिका वा नगरपालिकांमध्ये विकासकांकडून झोपडपट्टी पुनर्विकास योजना अव्यवहार्य असल्यामुळे फारसा रस घेतला जात नाही. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्विकास योजना मुंबई महानगर क्षेत्रातही अन्य भूखंडासोबत संलग्न करण्याची परवानगी देण्यात येणार आहे. त्यामुळे विकासकांना अतिरिक्त चटईक्षेत्रफळाचा लाभ होऊ शकेल. मात्र अन्य योजना संलग्न करताना विकासकांना अधिमूल्य अदा करावे लागणार आहे. विक्री घटकात निर्माण होणाऱ्या क्षेत्रफळापोटी रेडी रेकनरच्या ३० टक्के दराने मिळणाऱ्या अनर्जित रकमेवर हे अधिमूल्य आकारले जाणार आहे. या योजनेत विकासकांना एक किंवा त्यापेक्षा अधिक भूखंडावर असलेल्या झोपड्याचा एकाच भूखंडावर पुनर्विकास करता येणार आहे. अशावेळी विक्री घटकासाठी उपलब्ध असलेले चटईक्षेत्रफळ अन्य भूखंडावर वापरता येणार आहे. मात्र त्यासाठी एक किंवा अनेक भूखंड मालकांची संमती आवश्यक असल्याचे या अधिसूचनेत म्हटले आहे.

याशिवाय योजना संलग्न करताना भूखंड वा इमारत स्वतंत्र असणे आवश्यक आहे. या योजनेत निर्माण होणाऱ्या प्रकल्पबाधितांच्या सदनिका संबंधित प्राधिकरणांकडे सुपूर्द करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या योजनेत पुनर्वसनातील इमारत २५ ते ७९ मीटर (२२ मजली) उंचीची असल्यास रस्ता असलेल्या ठिकाणी किमान एका बाजुला सहा मीटर जागा सोडणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# 'सीएसएमटी'वरील १८ नंबरचा प्लॅटफॉर्म ३ महिने बंद राहणार

■ **मुंबई। प्रतिनिधीः**

मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा १८ नंबरचा प्लॅटफॉर्म पायाभूत कामे आणि सुरक्षा बॅरिकेड्स उभारण्याच्या कामासाठी १ ऑक्टोबरपासून सुमारे ३ महिने बंद राहणार आहे. त्यामुळे या प्लॅटफॉर्मवरून सुटणाऱ्या अमरावती-सीएसएमटी आणि बल्लारशाह-सीएसएमटी या दोन्ही एक्स्प्रेस गाड्या दादरपर्यंत चालवण्यात येणार आहे. सीएसएमटी पुनर्विकास प्रकल्पासाठी २४५० कोटी रुपयांचा खर्च करण्यात येत आहे. रेल्वे भूमी विकास प्राधिकरण (आरएलडीए) मार्फत



करण्यात येत आहेत. सीएसएमटीच्या सर्व प्लॅटफॉर्मवर विस्तारित डेक उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी टप्प्याटप्प्याने सर्व प्लॅटफॉर्मवर पायलिंगचे काम केले जात आहे. यासाठी हा प्लॅटफॉर्म बंद करण्यात येत आहे. सध्या सीएसएमटी येथे प्लॅटफॉर्म ११ ते १८ वर सुमारे २० ते २२ एक्स्प्रेस दररोज धावतात. या ट्रेन पकडण्यासाठी सुमारे १ लाख प्रवासी रोज प्लॅटफॉर्म १८ वरून इतर प्लॅटफॉर्मवर पोहोचतात. त्यामुळे हा प्लॅटफॉर्म तीन महिने बंद राहिला तर प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. रेल्वेने गेल्यावर्षी प्लॅटफॉर्म १२ आणि १३ च्या विस्तारीकरणाचे काम हाती घेतले. त्यामुळे ते बंद करण्यात आले होते. परिणामी या ठिकाणावरून सुटणाऱ्या एक्सप्रेस दादरसह इतर ठिकाणांवरून सोडण्यात येत होत्या. नॉन-इंटरलॉकिंगची कामे मार्च महिन्यात पूर्ण झाली असून, रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून सुरक्षा प्रमाणपत्रदेखील रेल्वेला मिळाले आहे.

# 'बेस्ट'ला पूर्णवेळ अधिकारी मिळाल्यानं आता सेवेत सुधारणा आवश्यक



■ **मुंबई। प्रतिनिधीः**

बेस्टच्या महाव्यवस्थापकपदी सोनिया सेठी यांची राज्य सरकारने नियुक्ती केली. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास सेवानिवृत्त झाल्यानंतर अंतरिम व्यवस्था म्हणून आशिष शर्मा यांच्याकडे बेस्टचा तात्पुरता कार्यभार महिनाभरापूर्वी सोपविण्यात आला होता. आता पूर्णवेळ महाव्यवस्थापक म्हणून सेठी यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले असताना मदत कार्यात आपत्ती व्यवस्थापन तसेच मदत आणि पुनर्वसन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सेठी या महत्त्वाची भूमिका बजावत होत्या. बदलीचा निर्णय झाला तेव्हा त्या बैठकीच्या निमित्ताने दिल्लीत होत्या. सेठी यांच्या जागी नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या विनिता वैद सिंगल यांची बदली करण्यात आली आहे. पूर्णवेळ अधिकारी काही महिन्यांपासून बेस्टला पूर्णवेळ महाव्यवस्थापक नव्हते. अनिल डिग्गीकर यांच्यानंतर बेस्टच्या महाव्यस्थापकपदाचा अतिरिक्त कार्यभार सुरुवातीला एस. व्ही. आर. श्रीनिवास आणि आशिष शर्मा यांच्याकडे होता. आता सेठी यांच्या नियुक्तीमुळे बेस्टला पूर्णवेळ महाव्यस्थापक मिळाले आहेत.

# मुंबईत बेकायदेशीर भाडे आकारणाऱ्या ॲप-आधारित टॅक्सी, रिक्षा आणि वाहनांवर कारवाईचा बडगा




■ **मुंबई। प्रतिनिधीः**

राज्य शासनाने दिलेल्या आदेशानुसार ॲप-आधारित वाहनचालकांनी नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी परिवहन विभाग आणि मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण (टटफ्ळअ) यांनी विशेष मोहीम हाती घेतली असून, गेल्या काही दिवसांत २६३ अवैधरीत्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तब्बल ३.८८ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. शासनाच्या निर्णयानुसार ॲप-बेस्ड वाहने चालविण्यासाठी चालकांकडे वैध परवाना असणे तसेच चालकांना भाड्याच्या रकमेपैकी ८० टक्के भाडे देणे बंधनकारक असून, प्रवाशांकडून ठरलेल्या दरापेक्षा कमी-जास्त भाडे आकारता येणार नाही, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई मुंबईत अनेक ॲप-आधारित वाहने प्रवाशांकडून मनमानी भाडे वसूल करत असल्याच्या तक्रारींनंतर परिवहन विभागाने थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. विशेष म्हणजे, शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणेच प्रवाशांकडून भाडे आकारले पाहिजे. परंतु काही चालक विना परवाना तसेच अतिरिक्त शुल्क आकारत असल्याचे आढळून आले. अशा चालकांवर कारवाईसाठी आझाद मैदान पोलिस ठाणे, सांताक्रूझ पोलिस ठाणे आणि अंधेरी पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आलेले आहेत. ऑटो-टॅक्सींसाठी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने ठरवलेल्या दरांनुसार-

ऑटो रिक्षासाठी (मीटरप्रमाणे) पहिल्या टप्प्यासाठी (१.५ किमी)- २६ रुपए भाडे

काळी-पिवळी टॅक्सी (मीटरप्रमाणे) पहिल्या १.५ किमी साठी - ३१ रुपए भाडे

त्यापुढे मीटरनुसार प्रवासाचे दर २०.६६ रुपए प्रति किमी आकारले जातील.

एसी वाहनांना १०% अधिक भाडे निश्चित केले आहे.

ह्यमहाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम २०२५ह्न अंतर्गत नवे आदेश

या नियमानुसार राज्यात ई-बाईक आणि इलेक्ट्रिक दुचाकींद्वारे प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी आहे. दुचाकींसाठी पहिल्या १.५ किमी प्रवासाचे भाडे ₹१५ तर नंतर प्रति किमी ₹ १०.२७ आकारण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# एका कॉलवर पोलिसांची मांडवात धडक; मुंबईच्या नियंत्रण कक्षातील ह्यनवदुर्गांह्नची कामगिरी



■ **मुंबई। प्रतिनिधीः**

मला वाचवा, माझे जबरदस्तीने लग्न लावत आहेत. एका अल्पवयीन मुलीचा हृदयद्रावक आवाज नियंत्रण कक्षात घुमला आणि अवघ्या पाच मिनिटांत पोलिसांचे पथक थेट लग्नाच्या मांडवात दाखल झाले. योग्य वेळी मिळालेल्या मदतीमुळे एका निष्पाप मुलीची बालविवाहातून सुटका झाली. ही घटना केवळ एक अपवाद नव्हे, तर नियंत्रण कक्षातील महिला कर्मचाऱ्यांच्या सततच्या सजगतेचे आणि संवेदनशीलतेचे द्योतक आहे. आमचे नाव कुठे झळकले नाही तरी चालेल; पण एखाद्याचा जीव वाचतो, हेच आमच्यासाठी खूप समाधान आहे, असे नियंत्रण कक्षातील नवदुर्गांचे म्हणणे आहे. दररोज ५ हजार ते ५,५०० कॉल्स नियंत्रण कक्षात येतात. त्यात महिला, लहान मुले, अपघातग्रस्त, ज्येष्ठ नागरिक, अग्नितांडव, वाहतूक अडचणी अशा विविध प्रकारची मदत मागणारे असतात. या सर्वांना वेळेत मदत पोहोचविण्याचे आव्हान पोलिस कर्मचाऱ्यांवर असते. विशेष म्हणजे या कामात महिला पोलिस अतुलनीय कामगिरी बजावत आहेत. नवरात्रोत्सवानिमित्ताने नियंत्रण कक्षात पडद्याआडून काम करणाऱ्या महिला पोलिसांच्या कायार्चा गौरव करणारा व्हिडीओ मुंबई पोलिसांनी सोशल मीडियावर शेअर करत त्यांचे कौतुक केले. नियंत्रण कक्षातील महिला अंमलदार वैभवी लोखंडे सांगतात, प्रत्येक कर्मचाऱ्याला दिवसाला जवळपास १७० ते २०० कॉल्स हाताळावे लागतात. प्रत्येक कॉलमध्ये कोणाच्या तरी आयुष्याचा निर्णायक क्षण असतो. महिला अंमलदार शालिनी देवरे यांचे म्हणणेही तसेच ठळक आहे. कॉल येताच आम्ही संबंधित पोलिस ठाण्याशी तत्काळ संपर्क साधतो. अनेकवेळा माहिती अपुरी असते; पण आम्ही प्रत्येक क्षणाचा योग्य उपयोग करत मदत पोहोचवतो.

# दरवर्षी मुंबईत केवळ ३५ हजार विवाहांची नोंदणी; मुंबई महापालिकेची खास जलद नोंदणीची सुविधा सुरु

■ **मुंबई। प्रतिनिधीः**

मुंबईची सव्वा कोटींची लोकसंख्या विचारात घेता मुंबईत दरवर्षी मोठ्या संख्येने विवाह होत असले तरी वार्षिक केवळ ३० ते ३५ हजार विवाहांचीच मुंबई महापालिकेकडे नोंदणी होत असते. नोंदणी करण्याच्या प्रक्रियेतील अडचणींमुळे हा दर अतिशय कमी आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेने विवाह नोंदणी जलद होण्यासाठी खास सुविधा तयार केल्या असून त्याची नुकतीच सुरुवात झाली आहे. या सुविधेअंतर्गत त्याच दिवशी विवाह प्रमाणपत्र मिळू शकणार आहे.

विवाह नोंदणी प्रमाणपत्र हे प्रत्येक दांम्पत्यासाठी अत्यंत महत्वाचा दस्तावेज आहे. वेगवेगळ्या शासकीय कामांसाठी ते आवश्यक असते. मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत ही विवाह नोंदणी होत असते. वर्षभरात मुंबईत जेवढे विवाह होतात. त्याच्या तुलनेत विवाह नोंदणीचे प्रमाण अत्यल्प आहे. याची कारणे मुंबई महापालिकेने शोधली असता मुंबईकरांना वेळेअभावी नोंदणी करणे गैरसोयीचे जाते. त्यामुळे या अडचणी कमी करण्यासाठी मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाने नवीन उपक्रम सुरू केला आहे.



मुंबई महापालिकेत केल्या जाणाऱ्या विवाह नोंदणी प्रक्रियेमध्ये दोन नवीन सेवा समाविष्ट करण्यात आल्या असून या सेवा २१ सप्टेंबरपासून सुरू झाल्या आहेत. महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील विवाह नोंदणी सेवा अंतर्गत आता शनिवार व रविवार असे आठवडा अखेरीचे दोन्ही दिवस सुरु राहणार आहे. तसेच, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सोमवार ते शुक्रवार) २० टक्के विवाह नोंदणी सेवा ही ह्यफास्टट्रॅकह्न म्हणून राखीव राहणार आहे. या सेवा अंतर्गत मिळणारे विवाह नोंदणी प्रमाणपत्र क्यूआर कोडसह उपलब्ध होणार आहे. लवकरच डिजिलॉकर सुविधेतही या विवाह नोंदणी प्रमाणपत्राचा समावेश होणार आहे.

विवाह नोंदणी ऑनलाईनही

शनिवारी व रविवारी विवाह नोंदणी इच्छुकांना करण्यासाठी वेळ प्राप्त करण्यासाठी (Appointment), ऑनलाइन अर्ज हा Appointment दिनांकाच्या अगोदरच्या दिवशी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत करता येईल. जलद विवाह नोंदणीचे अर्ज त्याच दिवशी प्रक्रियेसाठी ऑनलाइन सादर करता येतील. त्याकरीता मुंबई महापालिकेने https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlmarriagetab?guest_user=english ही लिंक दिली आहे.

अडीच हजाराचे अतिरिक्त शुल्क

साप्ताहिक सुटीतील आणि जलद विवाह नोंदणी सेवांसाठी नियमित शुल्क अधिक रुपये २,५००/- इतके अतिरिक्त शुल्क लागू असेल. हे शुल्क महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन भरता येणार आहे.

धार्मिक कक्षा रुंदावल्या...

विवाहाचे ठिकाण जर महाराष्ट्रातील असेल, तरच महानगरपालिकेकडे विवाह नोंदणी करता येत होती. परंतु, ही अट आता काढून टाकण्यात आली आहे. जगातील कोणत्याही ठिकाणी विवाह झालेले जोडपे यांच्यापैकी कोणीही एक व्यक्ती मुंबईत ज्या विभागात राहत असेल, त्या महानगरपालिकेच्या प्रशासकीय विभागात विवाह नोंदणी करू शकतात. तसेच याआधी, महानगरपालिकेच्या कार्यालयात हिंदू, मुस्लीम, बौद्ध, शीख, जैन धर्मीय या जोडप्यांची विवाह नोंदणी करण्यात येत होती.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com